## महिला व बालकल्याण विभाग

## जाहिर प्रकटन

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत महिलांना रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध करुन देऊन आर्थिक दृष्टया स्वावलंबी करणेच्या उददेशाने शहरातील मुलींना व महिलांना ड्रायव्हींग (थ्री-व्हीलर) प्रशिक्षण देणे. सदर थ्री-व्हीलर ड्रायव्हींगचे कच्चे व पक्के दोन्ही लायसन देणे बंधनकारक राहील याकामी दरपत्रक मागविणेत येत आहे. सदर दरपत्रक दि.१४/०५/२०२५ ते दि.२०/०५/२०२५ अखेर पर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागात स्विकारणेत येईल.

प्राप्त दरपत्रक दि.२०/०५/२०२५ रोजी दु. ५.०० वाजता उघडणेत येईल. याबाबतची सर्व अटी व शर्ती महिला व बालकल्याण विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

अटी / शर्ती -

१. प्रत्येक प्रशिक्षणचे दरपत्रक प्रति लाभार्थी देणेत यावे.

२.व्यक्ती/ संस्था नोंदणी प्रमाणपत्र व GST रजिस्ट्रेशन आवश्यक

३. प्रशिक्षणाचा पुर्ण कालावधी हा ४० दिवस ४५ मिनीट प्रती दिन असा राहील.

४. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सोबत देणे बंधनकारक राहील.

५. प्रशिक्षणामध्ये लाभार्थी संख्या ही ३० इतकी राहील.

६. थ्री-व्हीलर ड्रायव्हींगचे कच्चे व पक्के दोन्ही लायसन कोटेशनधारक यांनी देणे बंधनकारक राहील. यानुसार कोटेशन सादर करणेचे आहे.

७. नविन जी.एस.टी.कर प्रणालीनुसार दर नमूद करण्याचे आहेत.

८. प्राप्त दरपत्रक मधील सर्वात कमी दराच्या आधारे संबंधीत प्रशिक्षण कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत येईल.

९. प्रशिक्षणसाठी आवश्यक वाहन, ठिकाण निविदाधारकांनी पुरवठा करणे बंधनकारक राहील. महानगरपालिकेकडून पुरवठा करणेत येणार नाही यांची नोंद घ्यावी.

१०. उक्त प्रशिक्षणाबाबत तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन (Lecture) देणे आवश्यक आहे.

११. संबंधित प्रशिक्षण पूर्ण झालेनंतर लाभार्थी यांना प्रशिक्षण पुर्णत्वेबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत निविदाधारक यांनी स्व-खर्चाने देणे बंधनकारक राहील.

Signed by
Ashok Krishna Kumbhar
उपायुक्त
Date: 14-05-2025 18:06:22
इचलकरंजी महानगरपालिका